# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १३८/२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये विद्यापीठ निवड समितीद्वारे अथवा स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त केलेल्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठी प्रस्ताव प्राप्त होतात. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षासाठी विद्यापीठ निवड समितीद्वारे अथवा स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या अध्यापकांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थां यांनी विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेवून विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी (Permanent) अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करावी.

२. Government of Maharashtra, Law and Judiciary Department, Maharashtra Act No. VIII of 2004 मधील कलम ३(१)(ग) नुसार ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधींच्या नियुक्त्यांसाठी आरक्षण लागू असल्याने अध्यापकांची पदे स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ स्वरूपात (Adhoc) भरताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणानुसार त्यांच्या स्तरावर आरक्षण निश्चिती करून त्याची पडताळणी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडून करून घ्यावी आणि तद्नंतर जाहिरातीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ (Adhoc) स्वरूपात किंवा तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी दि. १५/०६/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ या कालावधीत स्थानिक निवड समितीचे आयोजन करण्यात यावे. तसेच ज्या दिवशी स्थानिक निवड समितीचे आयोजन केलेले आहे त्यानंतर ४८ तासांच्या आत निवड समिती अहवाल ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावा व मूळ निवड समिती अहवाल ७२ तासांच्या आत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा. तसेच शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दहा दिवसाच्या आत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने अपलोड करून प्रोफार्मा–बी सोबत शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावेत. तसेच सदर प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, फक्त अशा अध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीताचे मुदतवाढीचे (**continuation**) प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, शोध निबंध प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने दि. १५/०६/२०२४ ते दि. ३१/०८/२०२४ पर्यंत अपलोड करण्यात यावीत. **तसेच अपूर्ण व अस्पष्ट प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची संबंधित महाविद्यालय/संस्थेने नोंद घ्यावी.**

11/6/2024

जावक क्र. सीसीओ/१९८३
दिनांक – ११ जून, २०२४

(स. द. डावखर)
**उपकुलसचिव**

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था